# निकोप वातावरणात विद्यार्थी परिषद निवडणुका व्हाव्यात

## आनंद मापूसकर : विद्यार्थी निवडणूक विषयावर कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नव्या विद्यापीठ कायद्यानुसार यंदा विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये सुमारे २५ वर्षांनंतर विद्यार्थी परिषद निवडणुकीला सामोरी जात आहेत. याबाबतचे संभ्रम, गतानुभव, पूर्वग्रह बाजूला ठेवून सर्व घटकांनी निवडणुका निकोप वातावरणात यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी संघटितपणे प्रयत्न करावेत, असे आवाहन शिक्षणतज्ज्ञ आनंद मापूसकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने आयोजित एकदिवसीय कार्यशाळा शनिवारी वि. स. खांडेकर भाषा भवनमध्ये पार पडली. परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. यावेळी कोल्हापूर विभागाचे उच्च व तंत्र शिक्षण सहसंचालक डॉ. अजय साळी व कुलपती नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य अमित कुलकर्णी उपस्थित होते.

मापूसकर म्हणाले, लिंगडोह समिती आणि वेळुकर समितीच्या शिफारशींचा अभ्यास करून विद्यार्थी परिषद निवडणुकीसंदर्भातील कार्यवाहीचे स्वरूप निर्धारित केले आहे. उत्तम राजकीय नेतृत्व शैक्षणिक क्षेत्रामधून निर्माण व्हावे, ही अपेक्षा आहे.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात विद्यार्थी परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत बोलताना शिक्षणतज्ज्ञ आनंद मापूसकर. सोबत प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, महेश काकडे, डॉ. आर. व्ही. गुरव, अमित कुलकर्णी आदी. (छाया : पप्पू आत्तार)**

कोणत्याही प्रकारचा राजकीय हस्तक्षेप या विद्यार्थी निवडणुकांत असणार नाही.

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, नवीन निवडणुकांमध्ये कोणत्याही गैरप्रकाराला अजिबात स्थान नाही. हा कायदा अधिक विद्यार्थीकेंद्रित आहे. विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुणांचा विकास करण्यासाठी निवडणुकांचा अंतर्भाव कायद्यात केला आहे. कायद्यातील तरतुदी समजून घेऊन दोन महिन्यांच्या आत विद्यार्थी परिषद निवडणुकीची प्रक्रिया मार्गी लावण्याच्या दृष्टीने सर्वांनी सकारात्मक प्रयत्न करावेत.

यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. कार्यशाळेत दिवसभरातील विविध तांत्रिक सत्रांमध्ये प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी 'रेग्युलेटरी फ्रेमवर्क ऑफ इलेक्शन्स', आनंद मापूसकर यांनी 'प्रोसिजरल अस्पेक्ट्स् ऑफ इलेक्शन्स' आणि डॉ. आर.व्ही. गुरव यांनी 'टाईमलाईन फॉर इलेक्शन प्रोग्राम' या विषयांवर मार्गदर्शन केले.

# विद्यापीठीय निवडणुका निकोप व्हाव्यात

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'नव्या विद्यापीठ कायद्यानुसार यंदा महाराष्ट्रातील विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालये सुमारे २५ वर्षांनंतर नव्याने विद्यार्थी परिषद निवडणुकीला सामोरी जात आहेत. या संदर्भातील संभ्रम, गतानुभव अथवा पूर्वग्रह बाजूला ठेवून सर्व घटकांनी निवडणुका निकोप वातावरणात यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी संघटितपणे प्रयत्न करावेत,' असे आवाहन शिक्षणतज्ज्ञ आनंद मापुसकर यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने आयोजित एकदिवसीय कार्यशाळा वि. स. खांडेकर भाषा भवनमध्ये पार पडली. या परिषदेच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते. कोल्हापूर विभागाचे उच्च व तंत्र शिक्षण सहसंचालक डॉ. अजय साळी व कुलपती नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य अमित कुलकर्णी प्रमुख उपस्थित होते.

आनंद मापुसकर म्हणाले, 'महाराष्ट्र सरकारने नियुक्त केलेल्या लिंगडोह समिती आणि वेळुकर समिती या दोन समित्यांच्या शिफारशींचा अभ्यास करून विद्यार्थी परिषद निवडणुकीच्या संदर्भातील कार्यवाहीचे स्वरुप निर्धारित केले आहे. उत्तम राजकीय नेतृत्व शैक्षणिक क्षेत्रामधून निर्माण व्हावे, अशी स्वतः विद्यार्थी चळवळीमधून पुढे आलेल्या उच्च व



**शिक्षणतज्ज्ञांचे आवाहन; प्रक्रियेबद्दल मार्गदर्शन**

तंत्र शिक्षण मंत्री विनोद तावडे यांची अपेक्षा आहे. मात्र, या निवडणुकांमध्ये गैरप्रकार होण्याची शक्यता लक्षात घेऊन सर्व प्रकारच्या गैरप्रकारांना आळा बसेल, अशाच स्वरुपाचे एकरुप परिनियम शासनाने तयार केले आहेत. अगदी कोणत्याही प्रकारचा राजकीय हस्तक्षेप या विद्यार्थी निवडणुकांत असणार नाही. तसे निदर्शनास आल्यास उमेदवारी रद्द करण्यापर्यंतच्या तरतुदी यात केल्या आहेत.'

अमित कुलकर्णी म्हणाले, 'विद्यार्थी परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने संबंधित घटकांसाठी मध्यवर्ती कार्यशाळा घेणारे शिवाजी विद्यापीठ हे राज्यातील पहिले असल्याचे सांगितले. नजीकच्या काळात जिल्हा स्तरावर अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत महाविद्यालयांतही कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहेत. त्यालाही सर्वांनी प्रतिसाद द्यावा.'

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, 'पूर्वी १९७४च्या विद्यापीठ कायद्यानुसार झालेल्या निवडणुका आणि सध्याच्या विद्यापीठ कायद्यानुसार घेण्यात येत असलेल्या निवडणुका यांतील फरक सर्व संबंधित घटकांनी समजावून घ्यायला हवा. या निवडणुकांमध्ये कोणत्याही गैरप्रकाराला अजिबात स्थान नाही.'

परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनीही मार्गदर्शन केले. सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते रोपट्यास पाणी घालून कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी स्वागत केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. कार्यशाळेत दिवसभरातील विविध तांत्रिक सत्रांमध्ये प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी 'रेग्युलेटरी फ्रेमवर्क ऑफ इलेक्शन्स', आनंद मापुसकर यांनी 'प्रोसिजरल अस्पेक्ट्स ऑफ इलेक्शन्स'वर मार्गदर्शन केले.

# शिवाजी विद्यापीठात २१ पासून संगीत रस आस्वाद कार्यशाळा

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** संगीतातील संकल्पना समजून त्याचा निव्वळ आनंद घ्यावा, या उद्देशाने दि.२१ जून या राष्ट्रीय संगीत दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातील लोकविकास केंद्र आणि संगीत व नाट्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संगीत रस आस्वाद या तीन दिवसांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. लोकविकास केंद्रात दु.२ ते ५ या वेळेत ही कार्यशाळा होईल. संगीत व नाट्यशास्त्र विभागप्रमुख व ज्येष्ठ संगीत तज्ज्ञ डॉ. अंजली निगवेकर मार्गदर्शन करतील. कार्यशाळेत विविध प्रकारचे संगीत प्रवाह, संकल्पना त्यामधील साम्य व फरक आणि त्यातील गोडवा याची ओळख होणार आहे. त्याचबरोबर संगीताचे पैलू जाणून घेता येणार आहेत.